Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 212 – 216
DOI: 10.5281/zenodo.10115483
Original Research Article

# महात्मा गांधीजीचे ग्रामसफाई व आरोग्य विषयक विचार

प्रा. डॉ. विजयकुमार बाबाराव मेकेवाड

इतिहास विभाग, श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, लातूर ४१३५१२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: vmekewad@gmail.com

Received: 15 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 27 October, 2023

महात्मा गांधीच्या मते भारतातील आदर्श खेड्याची रचना अशी असायला पाहिजे की जिथे संपूर्ण स्वच्छता ठेवणे सुखकर होईल. "खेड्यातील घराची रचना भरपूर उजेड सूर्यप्रकाश आणि हवा खेळत राहण्यासारखी असेल आणि घराचे सामान आणि वस्तू वापरायच्या असतिल की जे त्या गावाच्या आसपासच्या पंचक्रोशीत मिळण्याजोगे असाव्यात."[१]

घराच्या पुढे मागे मोकळी जागा असायला हवी त्यात परसबाग घरच्या वापरण्यासाठी भाजीपाला लावता येईल गुरांकरिता निवारा करता येईल खेड्यातले रस्ते आणि गल्ल्या ह्या सोयीस्कर आणि मोठ्या असल्या पाहिजे त्या धुळीपासून मुक्त असाव्यात गावाच्या गरजेप्रमाणे गावात विहिरी असायला हव्यात आणि त्या सर्वांना वापरण्यात येण्यासारखे असल्या पाहिजेत गावात सर्वांकरीता उपस्नानगृह असतील एक सार्वजनिक सभागृहाचे ठिकान असले पाहिजे". गावाचे गुरं चारण्याकरता एक सामायिक कुरण असायला हवे.त्याच बरोबर सहकार दूध पुरवठा केंद्र आणि प्राथमिक व दुय्यम शाळा असल्या पाहिजेत व त्याच ठिकाणी औद्योगिक शिक्षणालाही मध्यवर्ती स्थान असले पाहिजे".[२] त्याच बरोबर गावाची पंचायत असेल त्यात गावातले सर्वच प्रकारचे वाद-विवाद मिटवले जाते गाव आपले धान्य भाजीपाला आणि फळे स्वतःच पिकवीन तसेच आपल्याला लागणारी खादी त्याच ठिकाणी निर्माण होईल. ही माझी गावाविषयीची एक सामान्य संकल्पना आहे खरंतर गावही विकसित झाली पाहिजे गावातला प्रत्येक मनुष्य हा स्वतःच्या कल्पनेतून कलेच्या माध्यमातून तो परिपूर्ण झाला पाहिजे. तो परिपूर्ण असेल तर त्याला आपला उदरनिर्वाह व्यवस्थित करता येईल अशी गांधीजींची खेड्याविषयीचे उदात कल्पना असल्याचे आपणाला पाहायला मिळते.

महात्मा गांधी यांच्या मते आपण खेड्याकडे दुर्लक्ष केलेले आहे.याला कारण म्हणजे मानवाने बुद्धी आणि श्रम यांत केलेला फरक होय.गावाच्या पुनर्घटनेत जर आपण ग्राम सफाईचा समावेश केला नाही तर आमची गांवे आज आहेत तशीच

उकिरड्यासारखी राहतील. निसर्गाच्या सान्निध्यात वसलेल्या सुंदर खेड्यात सर्वत्र् घाण आणि दुर्गंधीचे साम्राज्य पसरलेले आहे". स्च्छतेचे व सफाईचे काम अवघड होते.लोक घाण काढण्यात तयार नव्हते स्वतः च्या हाताने घाण साफ करण्याची तयारी, जे लोक रोज शेतात मजुरी करीत त्याचीही नव्हती"[३]

त्यामुळे आज खेड्यात गेल्यानंतर आपले मन प्रसन्न व प्रफुल्लित होत नाही.म्हणूनच प्रत्येक कार्यकर्त्यांनी खेड्यात जाऊन तेथील लोकांमध्ये वैचारिक व सार्वजनिक स्वच्छतेचे महत्व व त्याची आवश्यकता त्याला समजावून सांगितली पाहिजे. सार्वजनिक स्वच्छता हाच सदगुण आहे हे त्यांच्या मनावर बिंबवले पाहिजे. त्यांनी सर्व प्रकारच्या स्वच्छतेचे आदर्श नमुने स्वतःच्या आचरणापासून आणि प्रयत्नातांतून लोकांच्या समोर एक आदर्श म्हणून ठेवले पाहिजे. "आमची गावे घाणेच्या आणि अस्वच्छतेची माहेरघर झाली आहे त्यामुळे खेड्यात बालमृत्यू होतात जर आपण भंग्याचा दर्जा ब्राह्मणाच्या दर्जा इतकाच कर्तव्य बुद्धीने मान्य केला असता आणि वस्तुस्थान व न्यायता त्या दर्जाला ती पात्र आहे तर आज आपली खेडी तसेच खेड्यातले लोक स्वच्छता आणि नीटनेटकेपणाचा नमुना म्हणून आदर्श दिसले असते ते अनेक प्रकारच्या आजार अस्वच्छतेमुळे आणि आरोग्यकारी सवयीच्या अभावामुळे उत्पन्न होतात त्यांच्या तडाख्यातून आपण बरेचसे वाचला असतो"[४]

खेड्यातले लोक रूढीचा भाग म्हणून स्नान करतात कसे तरी ते स्नान उरकतात ते घरी किंवा विहीर, तलाव, नदी या ठिकाणी स्नान करतात .त्याच ठिकाणी कपडे धुण्यासाठी, पिण्याच्या पाण्यासाठी, स्वैपासाठी,याचा पाण्याचा उपयोग करतात. नदी, तलावात बऱ्याच वेळा गुरे, म्हशी लोळत पडलेल्या दिसतात.त्यामुळे तेथील पाणी घाण होते त्याला त्याची जाणीव नसते किंवा ते त्याची परवाही करत नाहीत हा त्यांचा फार मोठा दुर्गुण आहे.

महात्मा गांधीजी यांनी एका अनुभवाचे वर्णन स्त्रियांच्या अनेक सभांमध्ये मी केलेले आहे.भितीहरवा हे एक लहानसे खेडेगाव आहे.तिथे कित्येक स्त्रियांचे कपडे फारचं मलीन दिसून आले.त्या स्त्रियांची कपडे धुण्यासाठी व बदलण्यासाठी समजूत घालण्याविषयी मी कस्तुरबाईला सुचवले.त्या स्त्रियांशी बोलने झाले. त्यापैकी एका बाईने तिला आपल्या झोपडीत घेऊन गेली व म्हणाली "तुम्हीच पाहा ना, येथे काही पेटी, कपाट नाही, माझ्यापाशी ही मी नसेल आहे तेवढीच काय एक ती साडी आहे.ती मी धुवावी कशी? महात्माजीना म्हणावे, की आम्हाला कपडे देण्याची व्यवस्था करा. मग रोज काम करून रोज कपडे बदलायला तयार आहे."[५]

ग्रामीण भागातील सत्य कथन गांधीजीने केले आहे.स्वच्छेतेचे आणि आरोग्य विषयक विचार मांडत असताना त्यांनी त्याची पहिल्यांदा जाणिव करुन घेतली यातून मार्ग काढण्यासाठी स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र आणि लघु उद्योग, व्यवसाय, यावर भर दिला.चरखा आणि कापड निर्मिती करण्याचें काम देउन स्वावलंबी करण्यासाठी सतत कार्य केले.

महात्मा गांधीजीच्या मते खेडेगावातील लोकांना वेगवेगळया आजारांना तोंड द्यावे लागते. कारण खेड्यातला पाण्याचा साठा स्वच्छ ठेवण्याकडे दुर्लक्ष होते.या दुर्गुणामुळेच ते स्वतः अस्वच्छ राहतात आणि सभोवतालचा परिसर देखील अस्वच्छ करतात. त्यामुळेच ग्रामीण भागात खेड्यात वेगवेगळया प्रकारचे रोग निर्माण होतात. यावर एकच उपाय

म्हणजे शिक्षित कार्यकर्त्यांनी खेड्यात जाऊन जर माणसांमध्ये स्वच्छतेचे महत्व समजून सांगावे त्यासाठी कार्यकर्त्यांनी ग्रामसफाईचा कार्यक्रम हाती घेतला पाहिजे.खेड्यातले लोक ऐकोत वा न ऐकोत परंतु कार्यकर्त्यांनी हे काम केले पाहिजे. त्यांनी स्वच्छतेविषयी माहिती दिली पाहिजे आणि सतत कार्य करीत राहिले पाहिजे लोक हळूहळू त्याच्यामध्ये सहभागी होतील लोकांना त्याचे महत्त्वही पटेल आणि त्यांचाही सहभाग ग्रामसफाई मध्ये होईल. त्यांचा विश्वास निर्माण होईल आणि त्यातूनच गावातली खेड्यातली रस्ते नाल्या आठवडी बाजाराचे ठिकाण स्वच्छ होतील आणि त्यातून जमा होणाऱ्या कचऱ्याचा देखील योग्य पद्धतीने त्याची विल्हेवाट लावली तर तो कचरा कचरा नसून त्यापासून खत तयार करता येईल त्याचबरोबर कचऱ्यापासून जीवन उपयोगी वस्तू तयार करता येतील. तशा अनेक वस्तू तयार केल्या पाहिजे फाटके कागद आणि चिंध्यापासून वस्तू तयार करता येतात. "विष्टेपासून सेंद्रिय खत बनवता येते. त्याचेही ज्ञान खेड्यातल्या माणसाला दिले पाहिजे"[६]

सेंद्रिय खत ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर उत्पादित केली जाऊ शकते हा एक ग्राम उद्योग होऊ शकतो सेंद्रिय खताचे उत्पादन करून लोकांना ते वापरण्यासाठी प्रवर्त करावे सेंद्रिय खतामुळे पीक नेहमी वाढते याची जाणीव करून द्यायला हवी त्यामुळे शेतीचे उत्पादन वाढते.कचऱ्याप्रमाणेच लोकांनी सांडपाण्याची व्यवस्था कशी करावी धुळीचा उपद्रव्य कमी कसा करावा पिण्याचे पाणी स्वच्छ कसे ठेवावे याची शिक्षण दिले पाहिजे अशा प्रकारचे शिक्षण ग्रामीण भागामध्ये जितक्या जास्त प्रमाणात करून दिले जाईल तितक्या जास्त प्रमाणात खेड्यातील अप्रसन्नता रोगराई कमी होईल.स्वच्छतेमुळेच दुसरे देव पण निर्माण होईल हे फक्त लोकांना समजून सांगितले पाहिजे. ग्रामसफाईचा कार्यक्रम व्यवस्थित राबवल्यास खेड्यातील रोगराई कमी होईल त्यांचे विविध आरोग्य विषयीचे प्रश्न सुटतील असा महात्मा गांधींचा विश्वास होता. "आरोग्याच्या दृष्टीने गावाची सफाई ठेवणे हे ग्राम उद्योग संघापुढील सर्वात अवघड काम आहे लोकांनी जर मनापासून सहकार्य नसेल तर कोणते सरकार लोकांच्या सवयी काही बदलू शकणार नाही आणि ते सहकार्य जर लाभले तर त्याबाबत सरकारला फारसे काही करावे लागणार नाही."[७]

महात्मा गांधीजी आरोग्य आणि स्वच्छतेचे शिक्षण यासंदर्भात ग्रामसफाईचा समावेश न करता स्वतंत्र कार्यक्रम सांगितलेला आहे कारण त्यांची वेगवेगळया कार्यक्रमात ढवळाढवळ करण्याची इच्छा नाही त्यांच्यामध्ये प्रत्येक कार्यक्रमाला वेगळा संदर्भ व महत्त्व आहे आरोग्य व स्वच्छतेचे शिक्षण हा ग्रामसफाई पेक्षा वेगळा कार्यक्रम आहे.असे ते नेहमी म्हणत असत प्रत्येक माणसाने स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे ही कला आहे. प्रत्येक व्यक्तीने ही कला अवगत केली पाहिजे. आरोग्याचे व स्वच्छतेचे ज्ञान संपादन करणे व त्यानुसार वागणे हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. असे त्यांना वाटत असत.

स्वच्छतेविषयी ग्रामीण भागातल्या माणसाची मानसिकता आपण अभ्यासली तर असे दिसते की कुटुंबातली माणसे आपले स्वतःचे घर स्वच्छ ठेवते परंतु शेजारच्या घराविषयी त्यांना काही वाटणार नाही ते आपले अंगण कचरा किडा मुंगी स्वच्छ करतील आणि काही कचरा शेजारच्या अंगणात ढकलून लावतील कारण सामूहिक जबाबदारीचा अभाव या

ठिकाणी आम्हाला पाहायला मिळतो .त्यामुळे हा विचार बदलला पाहिजे. त्यांच्याच विचाराच्या माध्यमातून परिवर्तन घडलं पाहिजे. तरच गाव स्वच्छ होऊ शकतो विचाराने माणसाचे परिवर्तन होते. यावर त्यांचा विश्वास होता.

"ग्रामस्वच्छतेसाठी काही भांडवल लागत नाही एक झाडू एक टोपली एक पावडे आणि कुराड आणि फार झाले तर काही जंतुनाशक औषध तेवढ्यापुरतेच लागेल त्याचबरोबर प्रत्येक घरामध्ये निर्माण होणारे कोरडी राख जी जंतुनाशक औषधे इतकीच परिणामकारक ठरणारी असते ती"[६]

खेड्यातल्या लोकांना समजावून सांगितली पाहिजे त्याचा वापर कसा केला पाहिजे स्वतःच्या स्वच्छतेबरोबरच गावाची स्वच्छता कशी करता आली पाहिजे याचेही ज्ञान देणे गरजेचे आहे स्वच्छतेचा वसा प्रत्येक गावात निर्माण केला पाहिजे तरच गावाचे आरोग्य सुदृढ होईल सामान्य माणूस सुदृढ झाला तर शेतीसुधारे त्याचबरोबर गाव सुधारेल आणि त्याच बरोबर देश सुधारेल म्हणून गांधीजी म्हणाले की खेड्याकडे चला.

महात्मा गांधीजींच्या मते जगातील विकसित राष्ट्रांमध्ये नागरिकांना आरोग्य व स्वच्छते संबंधित अचूक व परिपूर्ण ज्ञान असते ते आरोग्य व स्वच्छतेच्या नियमांचे काटेकोर पालन करतात म्हणूनच त्यांच्या आरोग्य निरोगी असते त्यांच्या आयुर्मान जास्त आढळते भारतातील व्यक्तींना देखील आरोग्य व स्वच्छतेच्या नियमांचे ज्ञान करून घेणे आवश्यक आहे. त्यांच्यातील या नियमांच्या अज्ञानामुळे ते अनेक व्याधीचे शिकार होतात. आपल्याकडील वाढत्या मृत्यूस या नियमांचे अज्ञान हेच कारण कारणीभूत आहे.आपल्याकडे व्यक्तींना या नियमांचे व्यवस्थित ज्ञान करून दिल्यास आपल्याकडील देखील मृत्यूच्या प्रमाणात घट होऊ शकते असा त्यांचा दृढ विश्वास होता.

महात्मा गांधीजींच्या मते निरोगी शरीरात निरोगी मन असते हे स्वयं सिद्धत्व आहे शरीर व मन यांच्यात अनिवार्य संबंध असतो कोणतीही निरोगी मनाची व्यक्ती हिंसाचाराचा त्याग करीत असते या नियमांचे पालन केल्यास प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे शरीर व मन निरोगी ठेवता येते त्यांनी निरोगी शरीर व मनाचे खालील अत्यंत सोपे नियम सांगितलेले पाहायला मिळतात ते नियम त्यांच्या भाषेत मन निरोगी ठेवता येते त्यांनी निरोगी शरीर व मनाचे अत्यंत सोपे नियम सांगितलेले आहे ते नियम त्यांच्या भाषेत असे की "अत्यंत शुद्ध विचार मनात आणित जा आणि सर्व रिकामटेकड्या व मलीन विचाराची हकलपट्टी करा"

शारीरिक व मानसिक श्रमात समतोल राखा स्वच्छ व ताजी हवा घ्या ताठ उभे रहा ताट बसा एकूणच आपल्या कामात व्यवस्थित व निर्मळ रहा प्रत्येक काम तुमच्या अंतरिक स्थितीचे निर्देशक होऊ द्या आपल्या मनात बांधवांच्या सेवेसाठी जगण्यासाठी अन्नग्रहण करा स्वतःच्या स्वादप्राप्तीसाठी खाऊ नका तुमचे मन व शरीर यांना व्यवस्थित ठेवण्यासाठी आवश्यक असेल तितकेच तुमचा आहार ठेवा आरोग्याच्या दृष्टीने आहाराचे महत्त्व विशद केलेल्या मला पाहायला मिळतात. तुमचे पाणी अण्णा हवा ही सर्व स्वच्छ शुद्ध असली पाहिजे. केवळ स्वतापूर्ती स्वच्छता बाळगू नका ही विविध स्वच्छता तुम्हाला स्वतःसाठी पाळावयाची असेल तर स्वच्छता आपल्या सभोवताली करा महात्मा गांधीजीना असा विश्वास होता की जर प्रत्येक व्यक्तीने या आरोग्य व स्वच्छतेच्या नियमाचे पालन केले तर निरोगी शरीर व मन

निरोगी राहील त्याचप्रमाणे समाज देखील निरोगी होईल निरोगी व्यक्ती व समाजाशिवाय विकास होत नसतो असे त्यांचे स्पष्ट मत होते.

**संदर्भ सूची**

१. भाऊ धर्माधिकारी (संपा/अनु) ग्राम स्वराज्य, गांधी विचार दर्शन: खंड ८, गांधी स्मारक निधी (महाराष्ट्र शाखा) अंतर्गत गांधी वाङ:मय प्रकाशन समिती, १२४२ सदाशिव, विद्यापीठ वाडा, पुणे २, पृ.क्र. १४

२. कित्ता पृ.क्र. १४

३. सिताराम पुरूषोत्तम पटवर्धन (अनु) सत्याचे प्रयोग आत्मकथा, नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद -१४ ३१ वे पूनर्मुद्रण मार्च २०१२, पृ. ४०२

४. भाऊ धर्माधिकारी, उपरोक्त पृ.क्र. १४

५. सिताराम पुरूषोत्तम पटवर्धन, उपरोक्त .पृ.क्र. ४०३

६. नागोराव कुंभार, माहात्मा गांधीजीचे सामाजिक तत्वज्ञान, अरूणा प्रकाशन लातूर, प्रथमावृती ०२ ऑक्टोबर २०१२ पृ.क्र. ५६

७. सिताराम पुरूषोत्तम पटवर्धन, उपरोक्त पृ.क्र. १९